दिनांकः 14 फेब्रुवारी 2014

# आंध्र प्रदेश मध्ये ताळमेळ असण्याची गरज

**अरुण जेटली**
विरोधी पक्षनेते(राज्यसभा)

जसे जसे युपिए चा कार्यकाळ संपत चालला आहे, व्यवस्थेमधील त्यांची भागीदारी कमी होत चालली आहे. “माझ्या नंतर प्रलय” असे युपिए आपल्या नंतर सोडून जाणे पाहत आहे. त्यांच्या कारकीर्दीच्या सुरुवातीसच संस्थांचे पतन, अर्थव्यवस्थेच्या विकास गतीमध्ये ढिसाळपणा, भ्रष्टाचार आणि सरकारच्या निर्णय घेण्यामध्ये विश्वसनीयतेचे स्तर कमी होतानाचे राहिले.

तेलंगणा राज्याच्या स्थापनेसंबंधी विवादास्पद प्रस्तावावर युपिएने आता पूर्णपणे हिम्मत हारली आहे. त्यांच्या आपल्याच पक्षात अंतर्गत असे तत्व निर्माण झाले आहे की ज्यावर त्यांना नियंत्रण मिळवणे कठिण झाले आहे. कोणत्याही प्रकारचा आरडाओरडा, हंगामा करण्याशिवाय संसदेचे सत्र चालवणे दुर्लभ होत चालले आहे. संसदेच्या कारवाईत बाधा प्रमुख विरोधकांच्या मार्फत होत नसून युपिएचे स्वतःचेच सदस्य त्यामध्ये बाधा निर्माण करित आहेत. सरकार, खासकरुन पंतप्रधान कार्यालय आणि गृहमंत्रालय पूर्णपणे ठप्प झाली आहे आणि जे मुद्दे हातामध्ये आहेत ते सोडविण्यासाठी कोणत्याही प्रकारची गोडी दाखविली जात नाही.

मोठ्या प्रमाणात जनतेची सहमती कायम ठेवण्याच्या दिशेने काम करण्यासाठी अजूनही उशीर झालेला नाही. सीमांध्रची राजधानी, सीमांध्र मध्ये वेगळे उच्च न्यायालय स्थापन करणे यांसारखे मुद्दे दोन राज्य बनण्याचे कारण या क्षेत्राला होणा-या नुकसान भरपाई करण्यासंदर्भातले आहे, क्षेत्रामधील पाणी आणि वीज संदर्भात अन्य मुद्द्यांचाही समाधान करणे गरजेचे आहे. एनडीए ने झारखंड, उत्तराखंड आणि छत्तीसगड राज्यांची स्थापना करण्याच्या वेळी सौहार्दपूर्ण प्रकारे समाधान केले. गुरुवारी संसदेत धक्काबुक्की आणि लाजीरवाणी परिस्थिती निर्माण करण्यामागे युपिए जबाबदार आहे. सदनाच्या कारवाईत बाधा पोचविणा-यांमध्ये अधिकाधिक खासदार युपिएचे होते. तेलंगणा आणि सीमांध्र यांच्या लोकप्रतिनिधींमध्ये मतभेद दूर करण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले गेले नाहीत. सरकारने ताळमेळ कायम ठेवण्यासाठी कोणतेही व्यासपीठ निर्माण केले नाही. संसद दोन्ही क्षेत्रांच्या आकांक्षांवर विचार-विनिमय करण्यास असमर्थ ठरली. या पूर्ण प्रक्रियेमध्ये भारतीय लोकतंत्राची बदनामी झाली आहे. संसदेत जे काही घडते त्यामुळे राजकारण्यांच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम होत आहे. तेलंगणा आणि सीमांध्र या दोघांना असे वाटते की, आपल्यावर अन्याय होत आहे. युपिए सरकारने सर्व बाजूने शासन कला सोडली आहे. अजुनही उशीर झालेला नाही की, ताळ-मेळ साठी व एकत्र येण्यासाठी संसदेच्या आत व संसदेच्या बाहेर एक व्यासपीठ तयार करण्याची गरज आहे, कारण तेलंगणाची स्थापना होऊ शकेल. त्याचबरोबर सीमांध्रच्या लोकांच्या समस्या किंवा चिंता दूर कराव्यात.